ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
टेलि. ५५६२७
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० | पुणें, बुधवार, १६ डिसेंबर, १९६४ | अंक २१

## प्रगतीचीं दोन चक्रें...




## शेती व उद्योगधंदे

उद्योगधंद्याचीं चक्रें अव्याहत फिरतीं ठेवण्यासाठीं पाण्यांचा सतत पुरवठा पाहिजे असतो, रसायनें आणि द्रवपदार्थ इकडून तिकडे न्यावे लागतात, मलिन पदार्थांचा निचरा करावा लागतो. हीं कामें पंपांच्या सहाय्यानें होतात. कारखान्यांत आणि शेतीसाठीं पदोपदीं पंपांची गरज असते. ही गरज **किर्लोस्कर पंप** उत्तम प्रकारें भागवीत आहेत.

किर्लोस्कर

पंपनिर्मितींत अग्रेसर



**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी – जिल्हा सांगली.

STUSA KM 9/64

# विविध माहिती

**लोकसंख्येचा धोका नजीक आहे**—लोकसंख्येच्या प्रश्नाचा अभ्यास करणाऱ्या अमेरिकेंतील संघटनेनें आपला वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यांत अशी माहिती देण्यांत आली आहे कीं, १९८० सालीं जगांतील लोकसंख्या १००कोटींनीं वाढून ४३० कोटी होईल. लोकसंख्येंत दरसाल ६·५ कोटींची वाढ होत आहे. १९८० च्या सुमारास दक्षिण अमेरिकेची लोकसंख्या ३७·४ कोटी होईल व चीनची लोकसंख्या ८५ कोटी होईल.

**जपानमधील विद्यार्थ्यांचे दंगे**—जपानमधील ओसाका शहरांतील एका माध्यमिक शाळेंतील १,५०० विद्यार्थ्यांनीं त्यांना केस आखूड कापून घेण्यासाठी देण्यांत आलेल्या सूचनेविरुद्ध दंगा केला. अल्पवयीन मुलांना दारूच्या दुकानीं अगर मोठ्या माणसांसाठी असलेल्या इतर दुकानांत सहज जातां येऊं नये म्हणून ही सूचना करण्यांत आली होती. आखूड केसामुळें मुलें ओळखण्यास सोपें जावें असा सूचनेचा उद्देश होता.

**कापसाच्या लागवडीचीं संशोधन केंद्रें**—गुजरात राज्यांत कापसाच्या विकासासाठी संशोधन करणारें केंद्र काढण्याचें इंडिअन मिल्स फेडरेशननें ठरविलें आहे. कापूस पिकविणाऱ्या सर्व राज्यांतहि अशीं केंद्रें काढण्यांत येणार आहेत. कापसाच्या पिकासाठी खास जमीन निवडून, त्यासाठी खतें पुरविणें, कीड-नाशक औषधें पुरविणें, इत्यादि काम संघटना करील.

**नव्या बोटीचा जलप्रवेश**—विशाखापट्टम् येथील कारखान्यांत बांधण्यांत आलेल्या एका नव्या बोटीचा जलप्रवेश समारंभ घडवून आणण्यांत आला. कारखान्यांत आतांपर्यंत ३७ बोटींची बांधणी करण्यांत आली असून त्या सर्वांचे मिळून वजन २ लाख ८० हजार टन भरेल. जलप्रवेश केलेली बोट ४१ वी आहे. आणखी तीन बोटी बांधून पुऱ्या होत आल्या आहेत. नव्या बोटीला 'पश्चिम बंगाल' नांव देण्यांत आलें आहे.

**जर्मन उद्योगपतींचा दौरा**—पुढील महिन्याच्या मध्याच्या सुमारास जर्मन उद्योगपतींचें व बँकवाल्यांचें एक मंडळ भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. भारतामधील खाजगी मालकीच्या विभागांत आणखी भांडवल गुंतविण्यास कितपत वाव आहे त्याची पाहणी मंडळ करणार आहे. जर्मन उद्योगपतींच्या ह्या भेटीचा दिल्ली येथील इंडिअन इन्व्हेस्टमेंट सेंटरनें पुरस्कार केलेला आहे.

**फातिमा जिनांना विरोध कां?**— लाहोर येथें अखिल पाकिस्तान सुन्नी परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेला ६५० कट्टर सुन्नी मुसलमान धार्मिक पुढारी आले होते. मुसलमान धर्माच्या राज्यप्रमुखाच्या जागीं एखाद्या स्त्रीनें स्थानापन्न होणें हें मुसलमानांच्या धर्माला विरोधी असून 'हराम' आहे असा फतवा परिषदेनें काढला आहे. पाकिस्तानच्या अध्यक्षांची निवडणूक आतां जवळ आलेली आहे.

**लोखंडाच्या खनिजाची निर्यात**—मध्यवर्ती सरकारच्या व्यापार खात्यानें इतर संबंधित खात्यांच्या सहकार्यानें चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत आणखी १·४ कोटी टन लोखंडाचे खनिज निर्यात करण्याची योजना आंखली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर १·६ कोटी टन खनिज निर्यात करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलेलें आहे. १९७० अखेर ३ कोटी टन खनिज निर्यात करावयाचें झाल्यास भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील अनेक बंदरांचा विकास करावा लागेल.

**जपानकडे बोटींची मागणी**—ब्रिटनमधील बोट बांधण्याचे कारखाने सध्यां मंदीच्या तडाख्यांत सांपडले आहेत. परंतु ह्याच वेळीं एका मोठ्या ब्रिटिश बोट कंपनीनें जपानकडे प्रत्येकीं ६२ हजार टन वजनाच्या तीन तेलवाहू बोटींच्या बांधणीची मागणी नोंदविली आहे. जपानमधील बोटी ब्रिटिश बोटींपेक्षा स्वस्त पडतात त्याचा हा परिणाम आहे.

**स्विस मुलींचा भारतामधील निवास**— आंतरराष्ट्रीय जीवनाची माहिती करून घेण्याच्या दृष्टीनें ६ स्विस मुलींचा एक गट अमरावती येथें राहण्यास आला आहे. शहरांतील ६ कुटुंबात त्या वास्तव्य करणार आहेत. भारतामधील आयुष्यक्रमाची जवळून ओळख करून घेण्याचा त्यांचा हेतु आहे.

**स्वस्त पुस्तकें हवींत**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनांत पुस्तकांसंबंधीं तीन दिवसांचा परिसंवाद आयोजित करण्यांत आला होता. परिसंवादाचें उद्घाटन करतांना नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष श्री. केतकर म्हणाले कीं, वाचकांना स्वस्त पुस्तकें देण्यास परवडावें म्हणून सरकारनें प्रकाशकांना आर्थिक मदत दिली पाहिजे. प्रकाशकांनींहि चांगल्या ग्रंथकारांना अधिक मोबदला दिला पाहिजे.

**बिहारमध्यें सिमेंटचे कारखाने**—चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत बिहार राज्यांत सिमेंटचे १० नवे कारखाने स्थापन करण्यांत यावयाचे आहेत. त्यांपैकी ५ कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागांत असतील. सर्व कारखान्यांना मिळून ३० कोटी रुपये भांडवल लागेल. कारखान्यांच्या उभारणीस नियोजन समितीची मान्यता अद्याप मिळावयाची आहे.


**तुम्ही तुमच्या मुलांबाळांवर, कुटुंबावर प्रेम करतां काय?**

करीत असाल, तर त्यांचेबद्दलच्या तुमच्या कर्तव्याची तुम्हांला जाणीव असलीच पाहिजे.

**अशा जाणीवेपोटीं तुमचें पहिलें महत्त्वाचें कार्य म्हणजे**

भविष्याकरितां बचत,
किमान बचतीपोटीं कमाल मोबदला,
सुरक्षितता,
तत्पर व सचोटीचे व्यवहार आणि
तुमच्या आर्थिक प्रश्नांबद्दल जरूर तेथें
तज्ज्ञांचा सल्ला आणि सवलतीच्या
अनेक योजना

यासाठी आपण आम्हांस
केव्हांहि विचारूं शकतां.

**बेळगांव बँक लिमिटेड**

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना : १९३०

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

**खेळता निधि ३ कोटींवर**

१ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत ३५ शाखा.

# अर्थ

बुधवार, १६ डिसेंबर, १९६४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंडियन रोड कॉंग्रेसचें जयपूर येथील अधिवेशन

इंडियन रोड कॉंग्रेसचें २८ वें अधिवेशन जयपूर येथें भरविण्यांत आलें होतें. राजस्थानचे गव्हर्नर डॉ. संपूर्णानंद ह्यांनीं अधिवेशनाचें उद्घाटन केलें. त्या प्रसंगीं ते म्हणाले कीं, अलीकडे रस्ते बांधण्याच्या कामांत नवनवीन तंत्रें वापरण्यांत येत असतात. रस्ते व पूल बांधणाऱ्या इंजिनिअरांनीं त्यांचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे. नवीन तंत्राचा वापर करणें आवश्यक असलें तरी भारतामधील एंजिनिअरांनीं देशांतील परिस्थितीशीं जुळेल अशा प्रकारचीं तंत्रेंहि शोधून काढलीं पाहिजेत. कारण, भारत हा देश गरीब असल्यामुळें परदेशांतील सर्वच तंत्रें येथें उपयोगी पडण्यासारखीं नाहींत. देशाचा कारभार नीट चालण्यासाठी आणि त्याच्या संरक्षणाची व्यवस्था नीट होण्यासाठी रस्त्यांच्या सुस्थितीकडे लक्ष देणें अगत्याचें आहे. परिषदेला भारताच्या निरनिराळ्या भागांतून ४० एंजिनिअर्स आले होते. मध्यवर्ती रस्ता-संशोधन संघटनेचे प्रमुख प्रा. एस. आर. मेहरा ह्यांनीं असें सांगितलें कीं, देशाच्या आर्थिक विकासाच्या वेगाबरोबर राहण्यासाठी रस्त्यांचा विकासहि झपाट्यानें झाला पाहिजे. रस्ता-विकासाचा २० वर्षांचा जो कार्यक्रम आंखण्यांत आला आहे त्याहीपेक्षा जलद प्रगतीची आवश्यकता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत रस्त्यांच्या कामासाठी ५९० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. पण प्रत्यक्ष मंजुरी मात्र ४५४ कोटी रुपयांचीच देण्यांत आली. रस्त्यांचा विकास केल्यामुळें चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नांत ७० टक्के वाढ होईल असा अंदाज आहे. सध्या हें उत्पन्न १ हजार कोटी रुपयांच्या आसपास आहे. ह्या उत्पन्नाचा विनियोग नव्या रस्त्यांसाठी व त्यांच्या सुस्थितीसाठी करण्यांत आला तरी रस्ताविकास योजनेच्या कार्यक्रमाला पुरेसा पैसा उपलब्ध होईल.

## आयुर्विम्याच्या कामावर महागाईचा परिणाम

आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या कामासंबंधींचा ७ वा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. बी. के. कौल ह्या अहवालांत म्हणतात कीं, अलीकडे देशांतील आर्थिक स्थिति कांहींशी अडचणीची झालेली आहे. त्यामुळें विमा कॉर्पोरेशनच्या धंद्यांत थोडीशी घट झालेली आहे. विमा उतरणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थिति घसरलेली असल्यामुळें त्यांना बचत करणें अवघड जात आहे. परिणामीं, विमा उतरण्याची त्यांची कुवत घटलेली आहे. तरीसुद्धां कॉर्पोरेशनची आर्थिक बळकटी वाढलेली आहे आणि त्याच्या चालू असलेल्या धंद्यांतहि वाढ झालेली आहे. ह्या गोष्टी सोडल्या तरी कॉर्पोरेशनच्या व्यवहारांतील इतर बाबींकडे लक्ष देण्यांत येत आहे. चालू धंदा चालू ठेवण्याकडे लक्ष पुरविण्यांत येत आहे; खर्चाच्या प्रमाणांत बचत करण्याकडे लक्ष देण्यांत येत आहे. कॉर्पोरेशननें गुंतविलेल्या पैशावर अधिक चांगलें उत्पन्न सुटेल ह्याविषयीं दक्षता घेण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें विम्याची हक्कपूर्तीहि शक्य तितक्या लवकर करण्यावर भर देण्यांत येत आहे. ग्रामीण भागांत कांहीं ठिकाणीं बँकाच्या सोयी नसतात. अशा ठिकाणाहून हप्ते भरणें विमेदारांना कठीण जातें. ग्रामीण भागांतील कांहीं निवडक पोस्ट-ऑफिसांतून विम्याचे हप्ते भरण्याची सोय करण्यांत आलेली आहे. ही सोय आणखी विस्तृत करण्याकडे लक्ष देण्यांत येत आहे. ग्रामीण भागांत उतरलीं जाणारीं विमापत्रकें चालू ठेवण्यास अशा सोयीमुळें सोपें जाईल. मार्च १९६४ अखेर कॉर्पोरेशननें एकूण १०३·२८ लाख विमापत्रकें दिलीं. त्यांची दर्शनी किंमत ३,५७१ कोटी रुपये इतकी होती. १९५५ च्या डिसेंबर अखेर सर्व आयुर्विमा कंपन्यांनीं जितका धंदा केला होता त्याच्या तिपटीनें हा धंदा आहे. ह्यावरून गेल्या ७॥ वर्षांत कॉर्पोरेशननें चांगलें काम केल्याचें दिसून येतें.

## इस्राइलच्या शेतीचा कौतुकास्पद विकास

इस्राइल देशानें आपल्या स्वतंत्र जीवनास १९४८ सालीं सुरुवात केली. त्या वेळीं त्याची आर्थिक परिस्थिति निकृष्ट होती आणि नैसर्गिक साधनसंपत्तीहि बेताची होती. इस्राइल हा देश लहान आहे. त्याचें क्षेत्रफळ अवघें ३ हजार चौरस मैल असून लोकसंख्या २५ लाखांच्या आसपास आहे. तरीसुद्धां १९५० पासून त्या देशानें स्पृहणीय प्रगति करून दाखविली आहे. देशाच्या वट्ट राष्ट्रीय उत्पन्नांत दरसाल सरासरी ११ टक्के वाढ होत आहे. हा वाढीचा वेग जगांत सर्वांत अधिक आहे. इस्राइलच्या अर्थ-व्यवस्थेंत शेतीला महत्त्वाचें स्थान आहे. शेतीच्या व्यवसायांतून लोकांच्या ८० टक्के अन्नपदार्थांचा पुरवठा करण्यांत येतो. देशाच्या निर्यात मालापैकी २५ टक्के माल शेतीचा अगर शेतीच्या मालापासून तयार करण्यांत आलेला असतो. तेथील शेतीचा व्यवसाय चांगला भरभराटीला आलेला आहे. काम करणाऱ्या एकूण लोकांपैकी फक्त १४·६ टक्के लोकच शेतींत गुंतलेले आहेत. सरकारनें शेतीसाठी नवा कार्यक्रम आंखला आहे. त्याप्रमाणें येत्या ५ वर्षांत शेतीच्या उत्पादनांत ४० टक्के वाढ होईल; पण शेतींत राबणाऱ्यांची संख्या मात्र १० टक्क्यांनींच वाढेल अशी अपेक्षा आहे. इस्राइलमध्यें एकूण १० लाख एकर जमीन लागवडीखालीं असून त्यापैकी ३५ टक्के जमिनीला पाटबंधाऱ्यांच्या साह्यानें पाणीपुरवठा करण्यांत येतो. देशांतील भौगोलिक आणि हवामानाच्या परिस्थितींत बरीच विविधता आहे. शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याचा प्रश्न तेथें सर्वांत महत्त्वाचा मानला जातो. सहकारी शेतीमुळें इस्राइल हा देश सर्व जगभर प्रसिद्धि पावला आहे. दोन प्रकारच्या सहकारी शेती संघटना अस्तित्वांत आहेत. त्यापैकी कोणाचाच मालकीहक्क जमिनीवर नसतो. सर्व जमीन देशाच्या मालकीची करण्यांत आलेली आहे. ह्या संघटनांनीं शेतीच्या व्यवसायांत क्रांति घडवून आणली आहे.

## युनिट ट्रस्टच्या युनिट्समधील गुंतवणूक

### विक्रीची आणि फेरखरेदीची किंमत कशी ठरवितात ?

"यूनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या एका रोख्याची आजची विक्रीची व फेरखरेदीची किंमत अनुक्रमें रु. १७ व रु. १०·५० असून उद्याकरितांहि तीच राहील " अशा अर्थाची बातमी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत असते. ह्या रोख्याच्या विक्रीच्या आणि फेरखरेदीच्या किंमतींत तफावत कां असते व ती एवढी कां असते, हें कित्येकांच्या लक्षांत येत नाहीं.

१ जुलै, १९६४ रोजीं यूनिट ट्रस्टची योजना अमलांत आली. पहिल्या सहा आठवड्यांत, १४ ऑगस्ट, १९६४ अखेर ट्रस्टकडे रोख्यांसाठी १,२५,००० अर्ज आले. १४ ऑगस्टनंतर दररोज यूनिटची विक्रीची किंमत ठरविली जाते आणि ती वृत्तपत्रांतून आणि रेडिओवरून जाहीर केली जाते. त्यापूर्वी विक्रीची किंमत दर्शनी किमतीइतकीच रु. १० होती. म्हणजे वाढावा देऊनहि यूनिट्स विकत घेण्यासाठी अर्ज येत असतात. यूनिटसवरील डिव्हिडंडचा दर सर्वांना सारखाच असणार आहे.

ज्यांना आपल्याजवळील यूनिटस विकावयाचे आहेत, त्यांची खरेदी करण्यास ट्रस्टनें आतां प्रारंभ केला आहे. प्रारंभीं दिलेल्या बातमींत ही किंमत रु. १० दिलेली आहे. तीहि दररोज नवा हिशेब करून ठरविली जाते. यूनिटसच्या विक्रीच्या आणि फेरखरेदीच्या किंमतींमधील तफावतीचें कारण लक्षांत येण्यासाठी किंमती कशा ठरविल्या जातात हें समजून घेणें आवश्यक आहे. यूनिटयोजनेच्या ८ व्या व १० व्या कलमांत किंमती ठरविण्याचें नियम सांगितलेले आहेत.

प्रत्येक यूनिटच्या निवळ जिंदगीचें मूल्य ठरविणें, ही त्या क्रियेंतील पहिली पायरी आहे. ट्रस्टच्या सर्व जिंदगीचें मूल्य करून त्यांतून देणीं वजा करावयाचीं आणि येणाऱ्या रकमेला चालू यूनिटसच्या संख्येनें भागावयाचें, म्हणजे प्रत्येक यूनिटचें मूल्य निश्चित होतें. जिंदगीचें मूल्यमापन कसें केलें पाहिजे, हेंहि यूनिट योजनेनें नमूद केलेलें आहे; त्या मूल्यमापनांत ठेवी, रोखे, डिबेंचर्स, शेअर्स, इत्यादींमधील गुंतवणुकीवरील साचलेलें व्याजहि हिशेबांत घेतलें जातें.

ब्रोकरेज, कमिशन, स्टँपड्यूटी, इत्यादींवर जो ट्रस्टला खर्च करावा लागतो, तो लक्षांत घेऊन त्याप्रमाणें यूनिटच्या किमतींत वाढ करावी लागते; ही दुसरी पायरी. तिसरी पायरी म्हणजे, हिशेबाच्या सोईसाठी दोन–चार पैसे कमी जास्त करणें. अशा रीतीनें, यूनिटच्या विक्रीच्या किमतींत ( १ ) वर सांगितल्याप्रमाणें निव्वळ जिंदगीचें मूल्य, ( २ ) ब्रोकरेज, कमिशन, स्टँपड्यूटी, इत्यादींचा खर्च आणि ( ३ ) व्यवस्था खर्च, ह्यांचा अंतर्भाव होतो. येणारी रक्कम तिच्यावरच्या सर्वांत जवळच्या ५ पैशांपर्यंत वाढविली जाते. फेरखरेदीची किंमत ठरवितांना ब्रोकरेज, कमिशन, स्टँपड्यूटी, इत्यादींचा खर्च वजा केला जातो आणि येणारी रक्कम तिच्या खालच्या सर्वांत जवळच्या ५ पैशांपर्यंत कमी केली जाते. यूनिट ट्रस्टच्या व्यवहारांसंबंधीं अनुभवसिद्ध तत्त्वांप्रमाणेंच यूनिटसच्या विक्रीची आणि फेरखरेदीची किंमत ठरविली जाते.

( १ ) ट्रस्टचे यूनिट्स धारण करीत राहणारे, ( २ ) ज्यांना नव्यानें ट्रस्टमध्यें यावयाचें आहे, ते ( ३ ) आणि ज्यांना ट्रस्टमधून बाहेर पडावयाचें, ते अशा तीनहि प्रकारांच्या लोकांच्या हितांचें संरक्षण करणें, हें ट्रस्टचें काम आहे; त्या तिघांपैकी कोणाचाहि अवास्तव फायदा किंवा नुकसान होतां कामा नये. त्या दृष्टीनेंच युनिट्सच्या विक्रीच्या आणि फेरखरेदीच्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. ट्रस्ट हा युनिटधारकांचा समाइक फंड आहे. जे ट्रस्टमध्यें टिकून राहतात, ते त्याचे खरे मालक; त्यांच्यावरच गुंतवणुकीच्या, व्यवस्थेच्या व इतर खर्चांचा बोजा पडतो; त्याचप्रमाणें त्यांनाच ट्रस्टच्या नफ्यांत हिस्सा मिळतो. जे ट्रस्टला मागाहून येऊन मिळतात, त्यांनीं ट्रस्टच्या आधीं झालेल्या खर्चास हातभार लावणें आणि ट्रस्टच्या सांचलेल्या येण्याच्या पोटीं कांहीं रक्कम देणें युक्तच ठरतें. कारण, त्यांना त्याच दरानें डिव्हिडंड मिळणार असतें. म्हणून हा खर्च आणि उत्पन्नाचा अंश विक्रीच्या किंमतींत दाखल केला जातो. ज्यांना ट्रस्ट सोडून जावयाचें आहे त्यांचे पैसे देऊन टाकण्यासाठी ट्रस्टला आपली कांहीं गुंतवणूक विकून टाकावी लागेल. ही विक्री करून त्याची किंमत वसूल करण्यासाठी ट्रस्टला कांहीं खर्च येणार. गुंतवणूक विकते वेळीं नुकसानहि सोसण्याची पाळी येणार. ह्या दोन्ही गोष्टींसाठी फेरखरेदीच्या किंमतींत तरतूद करावी लागते. नाहींतर ट्रस्टच्या चालू युनिट्सधारकाचें नुकसान होण्याचा संभव राहावयाचा. डिव्हिडंड वाटण्यापूर्वी ट्रस्ट सोडून जाणारांकडून ट्रस्टच्या चालू खर्चाचा कांहीं भागहि वसूल करणें न्याय्य ठरतें; नाहींतर इतरांच्या नुकसानींतून त्याचा मात्र फायदा व्हावयाचा. युनिटसच्या फेरखरेदीच्या किंमतींत ह्या सर्व गोष्टींची दखल घेतलेली असते.

युनिटसची विक्रीची आणि फेरखरेदीची किंमत ह्यांतील तफावतीमुळें ट्रस्टला कांहीं फायदा होईल हें उघड आहे. त्यामुळें ट्रस्टच्या एकूण उत्पन्नांत भर पडेल आणि विद्यमान युनिटधारकांना तो वाटला जाईल. दीर्घ काळ युनिट्स धारण करणारांना अशा रीतीनें चालू उत्पन्नाचा, त्याचप्रमाणें युनिटसच्या भांडवली किंमतींमधील वाढीचा फायदा मिळत राहतो. युनिटसमध्यें आपले पैसे गुंतविणारे लोक ती दीर्घकालीन गुंतवणूक मानतात; ती सुरक्षित असते, तिच्यावर स्थिर दरानें व्याज मिळतें; भांडवली किंमतीच्या वाढीचा फायदाहि त्यांना प्राप्त होतो असा इतर देशांतील अनुभव आहे. भारतांतील हा उपक्रम अगदीं नवीन आहे.

युनिट ट्रस्ट ऑफ इंडियानें आपली गुंतवणूक ठराविक निश्चित व्याजाचे रोखे आणि अनिश्चित दरानें नफा मिळणारे रोखे, ह्यांत तारतम्य बाळगून केली आहे. युनिटस धारकांचें मूळ भांडवल तर सुरक्षित राहावें पण त्याबरोबर त्यांना वाजवी व्याजहि मिळावें आणि मूळ भांडवलाच्या गुंतवणुकींत वाढावाहि लाभावा हा गुंतवणुकीच्या धोरणाचा हेतु आहे. ट्रस्टनें १५० उद्योगधंद्यांच्या रोख्यांत गुंतवणूक केलेली आहे; त्यांत अग्रेसर, यशस्वी कंपन्यांचे रोखे आहेत. जुन्या, सुप्रतिष्ठित कंपन्यांचे नवे रोखे अंडरराइट करण्यासहि ट्रस्टनें प्रारंभ केला आहे. अंडररायटिंग करण्यांत त्याचप्रमाणें गुंतवणुकीच्या बाबतींत युनिटधारकांच्या हितासच प्राबल्य दिलें जातें.

---

### नव्या जॉइंट स्टॉक कंपन्या

१९६३–६४ मध्यें एकून ३४० कोटी रुपये अधिकृत भांडवलाच्या १,२२७ नव्या जॉइंट स्टॉक कंपन्या नोंदल्या गेल्या; १९६२–६३ मध्यें २५८ कोटी रुपये अधिकृत भांडवलाच्या १४९७ कंपन्या नोंदल्या होत्या. नोंदलेल्या कंपन्यांपैकी १५६ पब्लिक आणि १,०७२ प्रायव्हेट होत्या. त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें १४८कोटी रु. आणि १९२ कोटी रु. होतें १९५६–५७ ते १९६३–६४ ह्या मुदतींत एकूण नव्या कंपन्यांशीं प्रायव्हेट कंपन्यांचें प्रमाण ९०·१% वरून ८७·४% वर आलें; त्यांच्या अधिकृत भांडवलाचें प्रमाण ७४·३% वरून ५६·५% वर उतरलें.

**हस्तव्यवसायाच्या मालाचें प्रदर्शन**—जपानमधील एका कंपनीनें भारतामधील हस्तव्यवसायाच्या वस्तूंचें एक प्रदर्शन पुढील वर्षी जपानमध्यें भरविण्याचें ठरविलें आहे. प्रदर्शनांत लागणाऱ्या ३ ते ५ लाख रुपयांच्या वस्तु कंपनी खरेदी करणार आहे. ह्या वस्तूंत हस्तीदंताच्या आणि चंदनाच्या लाकडाच्या वस्तु असतील. जपानी कंपनीचा प्रतिनिधि भारतात हिंडून हस्तव्यवसायांत गुंतलेल्या कामगारांच्या तंत्राची मुद्दाम ओळख करून घेईल.

**बोकॅरो खाणींसाठी ब्रिटनची मदत**—बोकॅरो येथें खोलण्यांत येणाऱ्या तीन कोळसा खाणींसाठी ब्रिटनकडून आर्थिक मदत मिळण्याची शक्यता आहे. मदत मिळविण्यासाठी गेलीं ४ वर्षें वाटाघाटी चालू होत्या. त्या यशस्वी झाल्या तर खाणी खोदण्याच्या कामास पुढील वर्षाच्या आक्टोबरमध्यें प्रारंभ करण्यांत येईल.

**तेलाच्या दर्जाची हमी**—मद्रास राज्यांत काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्याला अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्याचें नॅशनल इराणियन ऑईल कंपनीनें कबूल केलें होतें. परंतु पुरविण्यांत येणाऱ्या तेलाच्या दर्जाबद्दल भारत सरकारनें कांहीं हमी मागितली होती. इराणच्या कंपनीनें ती दिली असल्यामुळें आतां वाटाघाटी पूर्ण झाल्या आहेत.

**छोट्या उद्योगधंद्यांना मदत**—नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन छोट्या उद्योगधंदेवाल्यांना ६० लाख रुपये किंमतीची यंत्रसामग्री व इतर साधनें पुरविणार आहे. पश्चिम जर्मन सरकारच्या विकास बँकेनें दिलेल्या कर्जाचा उपयोग करून ही सामग्री हप्तेबंद विक्रीच्या पद्धतीनें देण्यांत येणार आहे. कॉर्पोरेशननें आतांपर्यंत २० कोटी रुपयांची यंत्रसामग्री आयात करून पुरविली आहे.

**खताचे नवे कारखाने**—चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंतर्गत दक्षिण भारतांत तीन नवे खताचे कारखाने काढण्यांत यावयाचे आहेत. कारखान्याचे नमुने ठरविण्याचे, ते उभारण्याचे व नंतर चालविण्याचें काम त्रावणकोरमधील एका मोठ्या खताच्या कारखान्याकडे सोंपविण्यांत आलें आहे. ह्या कारखान्यांत भारत सरकारचें भाग भांडवल सर्वांत अधिक आहे. ह्याच कंपनीला १ लाख टन सिमेंटचें उत्पादन करणारा एक कारखाना काढण्याचा परवाना देण्यांत आला आहे.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था गिरगांव, मुंबई ४




दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## चित्रपटनिर्मितीच्या धंद्यांत जगांत तिसरा क्रमांक

चित्रपटनिर्मितीच्या धंद्यांत भारताचा क्रमांक जगांत तिसरा लागतो. भारतांत दरसाल ३०० पेक्षाहि अधिक चित्रपट काढण्यांत येतात. १९६३ सालीं एकूण ३०५ बोलपट काढण्यांत आले. त्यांपैकी ९३ हिंदी भाषेंतील होते; ५६ तामीळ भाषेंत; ४६ तेलगू भाषेंत; ३९ बंगालींत आणि बाकीचे इतर भाषांतील होते. देशांत मध्यम आकाराचे जे उद्योगधंदे आहेत त्यांत चित्रपट-निर्मितीच्या धंद्याचा भांडवलाच्या गुंतवणुकीच्या दृष्टीनें अनुक्रम दुसरा लागतो. वेतनाच्या वितरणाबाबत ४ था लागतो आणि रोजगारीवर असणाऱ्या माणसांच्या दृष्टीनें ५० वा लागतो. ह्या धंद्यांत सुमारें ८५ कोटी रुपयांचें भांडवल गुंतविलेलें असावें असा अंदाज आहे. सिनेमागृहें, स्टुडिओ, प्रयोगशाळा, इत्यादि संबंधित शाखांत १ लाख लोक काम करीत असावेत. १९६० सालीं फिल्म फायनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली. तेव्हांपासून कॉर्पोरेशननें १·०४ कोटी रुपयांचीं कर्जें धंद्यासाठी दिलीं आहेत. सिनेमाला लागणारी व छायाचित्रांना लागणारी कच्ची फिल्म तयार करण्यासाठी मध्यवर्ती सरकार उटकमंडजवळ एक कारखाना काढण्याच्या खटपटींत आहे. कारखान्यासाठी एका फ्रेंच कंपनीचें सहकार्य मिळविण्यांत आलें आहे. हिंदी चित्रपट परदेशीं पाठवून भारताला दुर्मीळ परदेशीय चलनाची प्राप्ति होते. १९६३ सालीं परदेशीं दाखविण्यांत आलेल्या हिंदी चित्रपटांपासून १·६७ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची मिळकत झाली. हिंदी चित्रपट मुख्यतः सीलोन, मलेशिआ, पूर्व आफ्रिका, ब्रह्मदेश, इंडोनेशिआ आणि मध्यपूर्वेंतील देश ह्यांना निर्यात करण्यांत येतात. चित्रपटांखेरीज भारतांत अनुबोधपटहि निर्माण करण्यांत येतात. ही निर्मिति भारत सरकारच्या चित्रपट विभागाकडूनच मुख्यतः होते.

## वजन-मापांचें मेट्रिक पद्धतींत रूपांतर

हिंदी वजन-मापांचें मेट्रिक पद्धतींत रूपांतर करण्याचें सरकारनें ठरविलें, तेव्हां त्याविरुद्ध कितीतरी आक्षेप घेण्यांत आले. परंतु हें रूपांतर अपेक्षेपेक्षा कमी वेळांत आणि खर्चांत घडून आलें आहे. औद्योगिक आणि व्यापारी प्रगतीस हा बदल आवश्यक असून त्यामुळें देशांत एकसूत्रीपणा येईल, ह्या कल्पनेनें पार्लमेंटनें १९५६ चा स्टँडर्ड्स ऑफ वेट्स आणि मेझर्स ॲक्ट मंजूर केला आणि पाठोपाठ घटक राज्यांनीं वेट्स अँड मेझर्स एन्फोर्समेंट्स कायदे मंजूर केले. कित्येकांना वाटलें, ५० वर्षांत-सुद्धां ह्या कायद्यांचा उद्देश सफल होणार नाहीं, परंतु आठ वर्षांतच तो साध्य झाला आहे. त्याला खर्च १०० कोटींचे वर लागेल, ही भीतीहि फोल ठरली आहे. सुमारें १२ कोटी रुपयेच त्याला लागले आहेत. त्याचा तपशील असा :—

| | रुपये |
|---|---|
| (१) जुनीं वजनें आणि मापें ह्यांच्या जागीं नवीं वजनें-मापें | २·८८ कोटी |
| (२) जुनीं वेइंग मशीन्स नव्या वजनावर बसविणें | ०·२५ कोटी |
| (३) राज्य सरकारांचा खर्च | ४·७० कोटी |
| (४) मध्यवर्ती सरकारचा खर्च | २·४६ कोटी |
| (५) उद्योगधंद्यांचा खर्च | १·७१ कोटी |
| (६) इतर | ०·२० कोटी |
| एकूण | १२·२० कोटी |

## मुलांना लागणाऱ्या खाद्यपदार्थांची निर्मिति

लहान मुलांना लागणाऱ्या खाद्य पदार्थांच्या उत्पादनाचें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्ट ७,५०० टनांचें ठरविण्यांत आलें होतें. परंतु आतां तें वाढवून १२ हजार टनांचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या पदार्थांची निर्मिति करण्यासाठीं अनेक अर्ज भारत सरकारकडे आलेले असून नव्या कारखान्यांना परवाने देण्याचा विचार चालू आहे. सध्यां देशांतील अनेक भागांत मुलांच्या खाद्यपदार्थांचा तुटवडा अनुभवास येत आहे, त्यामुळें त्यांच्या किंमती भरमसाठ वाढवून नफेबाजी करण्याची प्रवृत्तीहि दिसून येत आहे. सध्यां हे खाद्यपदार्थ तयार करण्याचे परवाने ४ कारखान्यांना देण्यांत आलेले आहेत. ते सर्व चालू झाले तर ५,००० टन खाद्यपदार्थ निर्माण होऊं शकतील. चारांपैकी दोनच कारखाने सध्यां चालू आहेत; बाकीचे दोन लवकरच उत्पादन करूं लागतील. १९६३ सालीं ४,२०० टन वजनाचे खाद्यपदार्थ तयार करण्यांत आले.

## बिनहिशेबी काळ्या पैशाचा अंदाज

गेल्या आठ दहा महिन्यांत भारतांत जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती पराकोटीला पोंचल्या. रोगाचीं लक्षणें गंभीर स्वरूप धारण करूं लागल्यावर त्याची चिकित्साहि अनेक दृष्टिकोणांतून होऊं लागली. बिनहिशेबी काळ्या पैशाच्या दाबामुळें महागाई भडकली असें एक निदान करण्यांत येतें. पश्चिम बंगालचे प्रमुख आयकर अधिकारी श्री. आर. एन. जैन ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं भारतांत दडवलेला काळा पैसा सुमारें २ ते ३ हजार कोटी रुपये असावा. कलकत्त्यांत व इतर मोठ्या शहरीं जे छापे घालण्यांत आले त्यांत कित्येक कोटींचा काळा पैसा उघडकीस आला. त्याचबरोबर हा पैसा दडविण्यासाठी दुहेरी हिशेबाचीं पुस्तकें लिहिलेलीं आढळून आलीं.

## हातमागाच्या कापडावरील सरचार्ज तरी रद्द करा

ग्रेट ब्रिटननें आयातीवर बसविलेल्या सरचार्जचा भारताच्या निर्गत व्यापारावर प्रतिकूल परिणाम होणार आहे. त्यामुळें आपलें दरसाल १० कोटी रु. चें नुकसान होईल. हातमागाच्या कापडावरील सरचार्जमुळें ह्या धंद्यांतील बेकारी वाढणार आहे. तेव्हां तो सरचार्ज तरी रद्द करावा, अशी भारत सरकारनें ब्रिटिश सरकारला विनंती केली आहे.

## ग्रामीण भागांत अधिक शाखा काढण्याची सूचना

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं असें सुचविलें आहे कीं बँकांनीं ग्रामीण भागांत नव्या शाखा काढून तेथें असणारा पैसा आकर्षित करण्याचा विचार करावा. शेतकऱ्यांजवळ असलेला शिलकी पैसा ठेवींच्या रूपानें मिळविण्यासाठी बँकांनीं थोडासा अधिक व्याजाचा दर देण्याची तयारी दाखवावी. भारत सरकारनें अन्नधान्य-व्यापार कॉर्पोरेशनची स्थापना केलेली असल्यामुळें गव्हर्नरांच्या सूचनेला विशेष अर्थ प्राप्त झाला आहे. कॉर्पोरेशन आणि राज्य सरकारें धान्याच्या मक्तेदारी खरेदीला आरंभ करणार आहेत. त्यामुळें त्यांच्या हालचालींबरोबर ग्रामीण भागांत पैशाचा बराच मोठा ओघ वाहात राहणार आहे. त्याचा फायदा घेऊन बँकांना आपला ग्रामीण भागांतील धंदा वाढवितां येईल अशी अपेक्षा आहे. बँकिंगची सोय व सवलत एकदा सुरू झाली कीं तिचा उपयोग पटण्यास लोकांना वेळ लागत नाहीं असा अनुभव आहे.

## ठाणें जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस केंद्रीय सहकारमंत्र्यांची भेट

### चेअरमन श्री. द. दा. काळे ह्यांनीं मांडलेल्या अडचणी : मंत्र्यांचें आश्वासन

समाज विकास व सहकार या खात्याचे सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री. एस्. के. डे, यांनीं ठाणें मध्यवर्ती सहकारी बँकेस ता. ११–११–१९६४ रोजीं संध्याकाळीं ६ वाजतां भेट दिली. बँकेचे चेअरमन श्री. द. दा. काळे यांनीं मुख्य पाहुण्यांचें स्वागत केलें व संचालक मंडळाच्या सभासदांची व बँकेच्या कांहीं कर्मचाऱ्यांची ओळख करून दिली. आपल्या स्वागतपर भाषणांत चेअरमन श्री. काळे यांनीं मंत्रिमहोदय यांना बँकेच्या कामकाजाची माहिती करून दिली व पालेमोड निर्मूलन योजना कार्यान्वित करण्याच्या बाबतींत येणाऱ्या अडचणी त्यांच्या पुढें मांडल्या व पालेमोड निर्मूलन करण्याचे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी उपाययोजना करणें ती राष्ट्रीय पातळीवरून झाली पाहिजे अशी त्यांस विनंती केली. तसेंच खासगी तांदूळ गिरण्यांच्या मालकांस सरकारनें नुकसानभरपाई देऊन त्या गिरण्या सहकारी मंडळ्यांकडे चालविण्यासाठीं देणें सहकारी चळवळीच्या दृष्टीनें आवश्यक आहे असेंहि सांगितलें.

शेतकऱ्यांच्या दुधाच्या जोड धंद्यासाठी राज्य सरकारच्या दूधपुरवठा मुंबई योजनेच्या मदतीनें ही बँक शेतकऱ्यास कर्जरूपानें साहाय्य करीत आहे. या बाबतींत धोका टाळण्यासाठी दुभत्या जनावरांचा विमा अखिल भारतीय जनरल को–ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी लि. मध्यें उतरला जातो; परंतु हल्लीं ह्या इन्शुरन्स सोसायटीनें कांहीं कारणास्तव विमा स्वीकारण्याचें बंद केलें आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी विमा सोसायटी ह्यासाठी स्वतंत्र रजिस्टर झाली आहे, परंतु विम्याचें काम करण्यासाठी लागणारें लायसन्स ह्या सोसायटीस नाकारण्यांत आलेलें आहे. ह्या व्यवसायांत गुंतलेल्या बँकेच्या पैशांच्या सुरक्षिततेसाठी ह्या विमा सोसायटीला कां परवाना दिला जात नाहीं ह्याबद्दल चौकशी व्हावी.

मच्छिमार सोसायट्यांच्या व्यवहारासाठी बँकेनें सुमारें ३० लाख रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. पकडलेल्या मच्छीपैकीं सुमारें १ कोटी रुपये किंमतीची सुकी मच्छी असते व सुमारें २ कोटी रुपये किंमतीची ताजी मच्छी असते. ही मच्छी मुंबईच्या मच्छी मार्केटमध्यें विकली जाते, परंतु पुष्कळदा मच्छीमार सोसायट्यांना कोल्ड स्टोअरेज व टिन फिश अशा प्रक्रिया युनिटची आवश्यकता भासते. याची पूर्तता होण्यासाठी सरकारनें मच्छीमार सोसायट्यांना आर्थिक साहाय्य करावें अशी विनंती आहे.

जंगल कामगार सोसायट्यांना बँकेकडून कर्ज देण्यांत येतें. त्यांची प्रगति होण्यासाठी त्यांनीं तयार केलेला माल विकण्यासाठी त्यांना गॅरंटीड मार्केट उपलब्ध करून देण्यांत यावें.

ह्या जिल्ह्यांत सहकारी मिठागरें स्थापन झालीं असून त्यांचें कार्य सुरू आहे. खासगी धंदेवाल्यांना हीं मिठागरें चालविण्यासाठी न देतां मिठागरांची सर्व जमीन केंद्र सरकारनें सहकारी संस्थांना द्यावी व अशा रीतीनें या संस्थांना केंद्र सरकारनें मदत करावी अशी विनंती आहे.

वरील सर्व अडचणी केंद्रीय मंत्रिमहोदय यांच्या निदर्शनास आणण्यांत आल्या. मंत्रिमहोदय यांनीं या बाबतींत सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचें आश्वासन दिलें व अशी सूचना केली कीं ह्या सर्व अडचणी बँकेनें मे. रजिस्ट्रार को. सो. पुणें यांस कळवाव्या म्हणजे सत्वर उपाय योजण्याच्या दृष्टीनें ते सर्व ठीक होईल व केंद्र सरकारलाहि त्या बाबतींत निर्णय घेणें सुलभ होईल. हरिजन, भूमिहीन वर्ग, आदिवासी व मागासलेला वर्ग (ज्यांना खरोखर आर्थिक मदतीची आत्यंतिक जरुरी आहे) अशांना बँक आर्थिक साहाय्य करीत आहे व शिवाय दुसऱ्या लोकांनाहि बँकेकडून आर्थिक मदत होत आहे याबद्दल मंत्रिमहोदय यांनीं समाधान व्यक्त केलें.


आरोग्य व खार जमिनीचे महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय उपमंत्री श्री. भाऊसाहेब वर्तक हेहि या समारंभास हजर होते.

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

### २०% करपात्र डिव्हिडंड

वरील कंपनीनें ३०–६–६४ अखेर संपलेल्या वर्षी साखर, स्पिरिट, धान्य, कडबा, इत्यादींची मिळून १,८५,३१,८६९ रु. ची विक्री केली; त्यापैकीं साखर १,७६,१६,६९५ रु. ची होती. सर्व खर्चवेच जाता व घसाऱ्यासाठी ७,०५,७४४ रु., नोकरवर्गाच्या बोनससाठी २,५०,००० रु. आणि करांसाठी १६,६१,००० रु. ची तरतूद केल्यावर निव्वळ नफा ११,३७,०७२ रु. उरला. डॅव्हलपमेंट रिबेट रिझर्व्ह, जनरल रिझर्व्ह, डिव्हिडंड ई. रिझर्व्ह, ह्यांसाठी ६,९७,२७३ रु. ची तरतूद केल्यावर ५,८९,३५२ रु. ची रक्कम शिल्लक राहते. क्यु. प्रे. शेअर्सवर द. सा. द. शें. ६·२५ वजा प्राप्तिकर रु. १·२५ म्हणजे निव्वळ ५०% आणि ऑर्डिनरी शेअर्सवर द. सा. द. शें. २०% (करपात्र) डिव्हिडंडची डायरेक्टर बोर्डानें शिफारस केली आहे.

STUDIO SARJERAO




मुदतीच्या ठेवीवर आपण आतां युनायटेड वेस्टर्न बँकेंत

**पावणे सात टक्के** पर्यंत व्याज मिळवूं शकता.

युनायटेड वेस्टर्न बँकेंत आपली ठेव ठेवणें केव्हांहि आपल्या हिताचें आणि फायद्याचेंहि आहे.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

(स्थापना) १९३६

बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

**कल्याण, आंबरनाथ व नातेपुतें**

**येथें बँकेच्या नवीन शाखा लौकरच सुरू होत आहेत.**

## जपानमधील लहान उद्योगधंद्यांची जोपासना

### (आपल्या जागतिक दौऱ्यानंतर श्री. रत्नाप्पा कुंभार ह्यांनीं केलेलें निवेदन)

आम्हीं पाहिलेले सर्व देश हे मोठ्या उद्योगधंद्याचे वाटतात आणि ते आहेतहि ही गोष्ट खरी आहे. पण या देशांतून मोठे उद्योगधंदे जरी चालू असले तरी त्या देशामध्यें लहान उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष नाहीं. जपानमध्यें तरी लहान उद्योगधंद्यांची जोपासना फारच चांगल्या तऱ्हेनें करण्यांत आलेली आहे. जपानमधील लहान उद्योगधंद्यांच्या प्रगतीची कल्पना खालील आंकड्यांवरून चांगली येईल म्हणून ती आंकडेवारी खाली देत आहे—

(१) जपान देशामध्येंच खपणाऱ्या एकूण मालापैकी लहान उद्योगधंद्यामध्यें निर्माण झालेला माल ... ... ५० टक्के

(२) जपानमधून बाहेर देशांना निर्यात होणाऱ्या मालामध्यें लहान उद्योगधंद्यांचा माल ... ... ५४ टक्के

(३) होलसेलर्सचा जो सर्व व्यापार होतो त्या व्यवहारामध्यें लहान धंद्यांचा भाग ... ... ५६ टक्के

(४) किरकोळ व्यवहारामध्यें जो व्यापार होतो त्यामध्यें लहान धंद्यांचा भाग ... ... ८७ टक्के

(५) जपानमधील एकूण सर्व कारखान्यांच्या संख्येमध्यें लहान धंद्यांचें प्रमाण ... ... ९९ टक्के

व

(६) मोठ्या उद्योगधंद्यांच्या संख्येचें प्रमाण फक्त १ टक्का

(७) लहान उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या एकूण माणसांची संख्या ... ... ६६ टक्के

(८) मोठ्या उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या माणसांची संख्या ... ... ३४ टक्के

जपानमधील या लहान उद्योगधंद्यांचा व्याप सर्व देशभर खेड्याखेड्यांतून विखुरलेला आहे. या धंद्यांना लागणारा कच्चा माल, त्याला लागणारीं साधनें व भांडवल व त्यांचा तयार होणारा माल व विक्रीची व्यवस्था या सर्व गोष्टींमध्यें सरकार जागरूकपणें प्रयत्न करतें. या लहान धंद्यामध्यें सहकारी तत्त्वावर चालू असलेल्या धंद्यांचें प्रमाणहि बरेंच मोठें आहे आणि हें प्रमाण लहान उद्योगधंद्यामध्यें ४० टक्के आहे. सहकारी तत्त्वावर चाललेल्या धंद्यामध्यें जे सभासद आहेत त्यांना व्यक्तिगत स्वरूपांत जो फायदा होतो त्यावर इतर लोकांप्रमाणेंच इनकमटॅक्स आकारला जातो.

लोकसंख्येनें बेजार झालेल्या आमच्यासारख्या भारत देशामध्यें लहान उद्योगधंद्यांचा प्रसार आणि व्यवस्था जपानमधील धंद्याप्रमाणें होण्याची गरज आहे आणि त्या दृष्टीनें जपानमधील चालू असलेल्या उद्योगधंद्यांची पाहणी सरकारी पातळीवरून व्हावी आणि त्याची अंमलबजावणी आमच्या देशामध्यें केली जावी असें मला प्रामाणिकपणें वाटतें. आम्हीं जें थोडेबहुत पाहिलें आहे त्या बाबतींत आमच्या लहान क्षेत्रांत जें कांहीं करतां येण्यासारखें आहे तें करण्याचा माझा विचार आहे. शिक्षण व आरोग्य वगैरे गोष्टींबाबतींतहि अतिशय जागरूकपणानें त्या देशांत प्रयत्न चालू आहेत. त्याही बाबतींत आम्हांला बरीच माहिती मिळालेली आहे. आमच्या परीनें त्याचा काय उपयोग करतां येईल तो करण्याची मी कोशीस करणार आहें.

---

## रेडिओवरील कार्यक्रमांचा शेतकऱ्यांवरील परिणाम

रेडिओवरील कार्यक्रमांच्याद्वारें प्रचार आणि शिक्षण उत्तम तऱ्हेनें करतां येतें. मागासलेल्या देशांत शेतकऱ्यांच्या जीवनावर प्रभावी परिणाम घडवून आणणारें तें हुकमी साधन आहे. उस्मानिआ विद्यापीठाच्या पत्रव्यवसाय खात्यानें रेडिओवरील कार्यक्रमांच्या खेडेगांवांतील लोकांच्यावर होणाऱ्या परिणामाची पाहणी केली आहे. हैदराबादपासून २० मैलांवर असलेल्या एका खेड्यांत पाहणीचें काम करणारे कांहीं विद्यार्थी आणि व्याख्याते ह्या कामासाठीं मुद्दाम गेले होते. तेथें त्यांनीं १०० स्त्री-पुरुषांच्या मुलाखती घेतल्या. १९५९ पासून सार्वजनिक रेडिओ असलेल्या एका खेडेगांवांतील ८० लोकांची तपासणी करण्यांत आली. पाहणींत असें दिसून आलें कीं खेड्यांतील एकतृतीयांश लोक रेडिओवरील कार्यक्रम नियमितपणें ऐकणारे होते. पण बहुतेक लोकांचा कल सिनेमामधील गाण्यीं आणि करमणुकीचे कार्यक्रम ऐकण्याकडे दिसून आला. खेडुतांसाठी करण्यांत येणारे खास कार्यक्रम आणि वृत्तप्रक्षेपण ऐकण्याविषयीं आस्था दिसून आली नाहीं. मात्र सधन आणि साक्षर शेतकरी बातम्या आणि ग्रामीण कार्यक्रम ऐकण्यास उत्सुक असतात. जे लोक रेडिओ ऐकतच नाहींत त्यांच्यांतील बरेचसे लोक कमी उत्पन्नाच्या गटांतील आणि निरक्षर होते असें आढळून आलें. सामाजिक चालीरीती आणि आर्थिक स्थान ह्यांमुळें स्त्रिया व हरिजन ह्यांना रेडिओवरिल कार्यक्रमाचा लाभ घेतां येत नाहीं. बहुतेक खेडूत मंडळी रेडिओवरील कार्यक्रम ऐकण्यास विशेष उत्सुक नसतात. रेडिओ ऐकण्यांत वेळ घालविण्यापासून फायदा नाहीं असें त्यांना वाटतें.

## विकसनशील देशांतील सामाजिक बदल

नियोजन समितीचे एक सभासद डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव सामाजिक बदलासंबंधीं भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय परिसंवादांत बोलतांना म्हणाले कीं, आर्थिक नियोजनाचा हेतु केवळ आर्थिक भरभराट साधण्याचा नसतो. चांगल्या समाजाची उभारणी करणें हाहि त्याचा एक हेतु असतो. अशा समाजांत सर्वांना संधि मिळाली पाहिजे आणि त्यांना एकमेकांबद्दल आस्था आणि स्नेहभाव वाटला पाहिजे. हें साध्य व्हावें म्हणून सामाजिक भावनेच्या वाढीचा हत्यारासारखा उपयोग करण्यांत येत असतो. परंतु सध्यां मात्र असें घडत असलेलें दिसत नाहीं. नियोजनाची जी सामाजिक बाजू आहे तिकडे योग्य त्या प्रमाणांत लक्ष दिलें जात नाहीं हें ह्याचें कारण आहे. आर्थिक विकासाचा कोणताहि कार्यक्रम यशस्वी व्हावयाचा असेल तर विकासाच्या कामांत भाग घेणाऱ्यांना उत्साह वाटला पाहिजे. गेल्या १४ वर्षांतील आर्थिक विकासाचा अनुभव समाधानकारक नाहीं हें मात्र खरें.

## खाजगी विभागाला अधिक अवसर द्या

कर्नाटक चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेपुढें बोलतांना एक प्रमुख उद्योगपती श्री. जी. डी. सोमाणी म्हणाले कीं, देशाचा आर्थिक आणि औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या कामीं खाजगी मालकीच्या विभागाला सध्यापेक्षा अधिक अवसर देण्यांत आला पाहिजे. सध्यांच्या नियोजन पद्धतींत कांहीं दोष आहेत, ते काढून टाकण्यांत आले पाहिजेत. औद्योगिक स्वरूपाचे प्रकल्प आणि शेती ह्यांच्यांत मेळ घालण्यांत आला पाहिजे. सध्यां अर्थव्यवस्थेंतील ह्या दोन विभागांचा कांहींसा स्वतंत्रपणें विकास करण्यांत येत आहे. पण ते परस्परावलंबी असल्यामुळें ह्या प्रयत्नांत एकसूत्रीपणाची गरज आहे. उत्पादनवाढीमुळेंच वाढत्या किंमतींना आळा बसणें शक्य आहे. ही उत्पादनवाढ सुसंगत प्रयत्नाशिवाय होणें कठीण आहे.

## कै. वालचंद हिराचंद ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण

### डेक्कन इन्स्टिट्यूटमधील समारंभ: शेठ लालचंद ह्यांचें भाषण

डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स पुणें, या संस्थेंत औद्योगिक महाराष्ट्राचे एक शिल्पकार, भारतीय औद्योगिक क्रांतीचे एक झुंजार प्रवर्तक व लालचंद उद्योग–समूहाचे संस्थापक कै. श्रीमान् शेठ वालचंद हिराचंद यांच्या तैलचित्राचें अनावरण त्यांच्या ८२ व्या जन्मतिथीचे दिवशीं त्यांचे धाकटे बंधु व दि प्रीमियर ऑटोमोबाइल्स लि., मुंबईचे अध्यक्ष, श्रीमान् शेठ लालचंद हिराचंद यांचे हस्तें पार पडलें. समारंभास कै. वालचंद शेठजींच्या कुटुंबियांपैकी श्रीमान् शेठ रतनचंद हिराचंद, श्रीमान् शेठ बाहुबली गुलाबचंद, सौ. ललिताबाई लालचंद, कै. वालचंदजींच्या कन्या श्रीमती कुसूमबाई मोतीचंद, व सौ. लीलाबाई भारत वगैरे मंडळी मुद्दाम हजर होती. याशिवाय अनेक नामवंत कारखानदार व संस्थासंबंधित मंडळी उपस्थित होती. समारंभाचे सुरुवातीस संस्थेचे अध्यक्ष श्री. द. ग. ऊर्फ अण्णासाहेब शेंबेकर यांनीं स्वागतपर भाषण करून समारंभाचें औचित्य विशद केलें. नंतर संस्थेचे प्राचार्य श्री. अ. ग. भोपटकर यांनीं संस्थेच्या कार्याचा व प्रगतीचा परिचय करून दिला. माननीय अध्यक्ष श्रीमान् शेठ लालचंद हिराचंद यांनीं कै. लालचंद शेठजींच्या फोटोचें अनावरण केल्यावर संस्थेचे संस्थापक गुरुवर्य प्रा. ग. कृ. ऊर्फ नानासाहेब भोपटकर यांनीं कै. वालचंदजींच्या व्यक्तिगत आठवणी सांगून त्यांच्यासंबंधीं गुण–गौरवपर भाषण करून श्रद्धांजली वाहिली. नंतर संस्थेचे उपाध्यक्ष श्री. भाऊसाहेब क्षीरसागर व व्यापारी महाराष्ट्राचे सहसंपादक श्री. गो. द. अभ्यंकर यांनीं कै. वालचंद शेठजींच्या कार्याचा गौरव करणारीं भाषणें केलीं. संस्थेचे संस्थापक गुरुवर्य नानासाहेब भोपटकर यांचे हस्तें माननीय अध्यक्ष शेठ लालचंद हिराचंद यांचा त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तिनिमित्त सत्कार करण्यांत आला. सौ. ललिताबाई लालचंद यांचाहि सौ. कुंदा अरविंद भोपटकर यांचे हस्तें सत्कार करण्यांत आला. अध्यक्ष श्रीमान् शेठ लालचंद हिराचंद यांनीं त्यानंतर आपलें अध्यक्षीय भाषण केलें. त्यांत तें म्हणाले,

### उद्योगवृद्धीला स्पर्धेची आणि नफ्याची आवश्यकता

"कै. वालचंद शेठजींच्या कार्याला यांचे चुलते कै. सखाराम नेमचंद शेठजी यांनीं खरें प्रोत्साहन दिलें. मोठें भांडवल असल्याशिवाय उद्योग होऊं शकत नाहीं ही गोष्ट सोडून द्यावी हें कै. वालचंदभाईच्या उदाहरणावरून दिसेल. पुणें सरस्वतीचें क्षेत्र असलें तरी तेथें आतां औद्योगिक विकास होत आहे. उद्योग-धंद्यांत नफा मिळाल्याशिवाय तो वाढणें शक्य नाहीं. कार्याचा मोबदला मिळाल्याशिवाय कार्याचा विस्तार नाहीं. सरकारहि सार्वजनिक उद्योगधंद्यांतूनच नफा मिळवीत आहे. प. जर्मनीचा विकास स्पर्धात्मक उद्योगांतूनच झाला आहे. आजची आपली प्रगति सरकारी नियंत्रणांनीं खुंटली आहे. आजचें युग स्पर्धेनें काम करण्याचें आहे. ब्रह्मा, विष्णु व महेश या पौराणिक त्रयीप्रमाणें अर्थशास्त्रांत उत्पादक, वितरक व ग्राहक ही त्रयी आहे. या संस्थेचे व्यापारी शिक्षणाचें हें कार्य आधुनिक उद्योगधंद्यांना पोषक आहे, हें निःसंशय. त्याची अत्यंत जरूरी आहे. तेव्हां या संस्थेला सर्व प्रकारचें साहाय्य देण्याचें मी स्वतःतर्फे, कुटुंबीयांतर्फे व वालचंद उद्योगसमूहातर्फे आश्वासन देतों."

शेवटीं संस्थेचे कार्यवाह श्री. शं. ह. धुपकर यांनीं यथोचित शब्दांत अध्यक्षांचे व उपस्थितांचे आभार मानल्यावर राष्ट्रगीत होऊन हा समारंभ संपला.


स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. २ कोटी, ९ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,१०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,१०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सीलस

व

स्वरूप केबल्स

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

( टेलिफोन नं. : ५५२०१ )

श्री. वा. काळे ह्यांचीं

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें

१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,

३ तुमचें स्थान कोणतें ?


महाराष्ट्र सरकारनें

तगाईवर मंजूर केलेले

"विजय" नांगर

वापरा. ४, ६ व ८ बैली

फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

## समर्थ को. कंझ्यूमर्स सोसायटी लि., ठाणें

वरील सोसायटीच्या सुमारें ७०,००० रु. खर्चून बांधलेल्या "सहकार मंदिर" इमारतीचा उद्घाटन समारंभ मध्यवर्ती सहकारमंत्री श्री. एस. के. डे यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या महिन्यांत झाला. त्यानिमित्त सोसायटीनें एक स्मरणपुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत संस्थेच्या प्रगतीचा उत्कृष्ट आढावा घेण्यांत आला असून सहकारी ग्राहक सोसायट्या व त्यांचे सभासद ह्यांना मार्गदर्शक असे सभासदांनींच अभ्यासपूर्वक लिहिलेले लेख छापलेले आहेत. सोसायटीनें गेल्या १७ वर्षांत मिळून १,६७,४१४ रु. नफा मिळविला आहे, त्यापैकीं ४७,५६८ रु. गेल्या वर्षाचा आहे; त्यापूर्वींचीं पांच वर्षें नफ्याची रक्कम दरवर्षी १० ते १५ हजार रु. होती. विक्रीचें प्रमाणहि चौपट झालें आहे.

## प. बर्लिनमधील लग्नाच्या बाजारांत तेजी

पश्चिम बर्लिन शहरांत विवाहबद्ध होणाऱ्या प्रत्येक दांपत्यास ३,००० मार्कांचें म्हणजे सुमारें २,५०० रुपयांचें कर्ज मिळतें. प्रत्येक मुलाच्या जन्मानंतर कर्जांतील एक चतुर्थांश रकमेची सूट मिळते. त्यामुळें तेथील लग्नाचा बाजार तेजींत आहे. शहरांतील १२ विवाहनोंदणी केंद्रांतून विवाहेच्छूंची झुंबड उडते. शहरांत मिळणारें चांगलें वेतन, करांत सूट व इतर सवलतींच्या ओढीनें नवीन तरुण येथें येतात.

## मेक्सिकोची शाळेच्या इमारतींची देणगी

मेक्सिकोच्या सरकारनें भारताला एका छोट्या शाळेची इमारत देणगी म्हणून दिली आहे. ह्या इमारतीचे कांहीं सुटे तयार भाग मेक्सिकोमधूनच मागविण्यांत आले. शाळेला लागणाऱ्या विटा व सिमेंटचे पत्रे मात्र देशीच वापरण्यांत आले. इमारतीसाठी १४ हजार रुपये खर्च आला. शाळेच्या इमारतींत दोन खोल्या आहेत. त्यांपैकीं एक वर्ग भरविण्यासाठीं असून तींत ५० विद्यार्थी बसूं शकतील. दुसऱ्या खोलींत शिक्षकाची राहण्याची सोय करण्यांत आलेली आहे. शिक्षकाच्या खोलींतच स्वयंपाकघर, झोंपण्याची खोली व अभ्यासिका ह्यांची व्यवस्था करण्यांत आली आहे. शाळांच्या इमारती बांधण्यासाठीं येणारा मोठा खर्च ग्रामीण भागांत करतां येणें कठीण असे. दिल्लीपासून ८ मैलांवर उभारण्यांत आलेल्या ह्या शाळेसारख्या इमारती मात्र थोडक्यांत बांधून होतील.

## 'अर्था'चे प्रतिनिधि श्री. कुलकर्णी ह्यांची प्रकृति सुधारत आहे

शनिवार दि. ५-१२-१९६४ रोजीं पहांटे १ वाजतां, श्री. द. रा. कुलकर्णी ह्यांच्या राहत्या घरावर (सहकारी गृहकुलसंस्था, सहकार नगर, अरण्येश्वराच्या मागें, पुणें, ह्या वसाहतीमधील) दरोडा पडून त्यांना मारहाण करण्यांत आली आणि त्यांच्या पत्नीच्या व मुलीच्या अंगावरील दागदागिने हिसकावून नेण्यांत आले, ही बातमी वृत्तपत्रांत छापून आलीच आहे. 'अर्था'चे प्रतिनिधि श्री. कुलकर्णी, ते हेच होत; त्यांच्या प्रकृतीसंबंधीं अनेक हितचिंतकांकडून विचारणा करणारीं पत्रें आम्हांस येत आहेत. श्री. कुलकर्णी आणि त्यांच्या पत्नी सौ. शांताबाई ह्या दोघांनाहि डोक्यावर तीक्ष्ण शस्त्राचे घाव घालण्यांत आले होते. त्यांना ससून इस्पितळांत नेण्यांत येऊन उपचार करण्यांत आले. दोघांचीहि प्रकृति प्रारंभीं चिंताजनक होती, पण ती आतां हळूहळू सुधारत असून धोका उरलेला नाहीं. त्यांना आणखी एक आठवडा तरी इस्पितळांत राहावें लागेल.

## मॉर्फिआ टोंचून घेण्याचा प्रचार

उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश आणि राजस्थान ह्या राज्यांतून अफूचें सेवन करण्याची संवय पुष्कळ लोकांना असते. तथापि अफूच्या सेवनावर निर्बंध असल्यामुळें ह्या संवयीच्या आहारीं गेलेल्या लोकांना ती मिळणें अवघड होते. ह्यांतूनच मॉर्फिआ टोंचून घेण्याची प्रवृत्ति विशेषतः उत्तर प्रदेशांत पसरत चालली आहे. सर्वच मामला चोरटा असल्यामुळें ह्या प्रवृत्तीचा प्रसार होऊं लागला आहे. मादक पदार्थांच्या सेवनाची अनधिकृत चट लोकांत एकदा पसरली कीं तिचें निर्मूलन करणें अतिशय अवघड किंबहुना अशक्यच होतें. ह्या बाबतींत अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशाचा अनुभवहि वेगळा नाहीं. अमेरिकेंत 'हिरॉइन' ह्या नांवाचें मादक औषध टोंचून घेणारे हजारों लोक आहेत. ते त्या औषधाच्या पकडींतून कधींच सुटत नाहींत.

**भाताच्या सहकारी गिरण्यांना मदत**—सहकारी पद्धतीवर चालविण्यांत येणाऱ्या भाताच्या गिरण्या स्थापन करण्यास मदत म्हणून नॅशनल कोऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें दीर्घ मुदतीचीं कर्जें देण्याचें ठरविलें आहे. ह्या गिरण्यांच्या उभारणीसाठी परदेशांतून यंत्रसामग्री मागविण्यांत येणार नाहीं. कर्जाची रक्कम राज्य सरकारांना देण्यांत येईल. एका सहकारी भातगिरणीसाठी सुमारें १ ते २ लाख रुपये लागतील असा अंदाज आहे.

**बनावट औषधांचा धोका**—बनावट औषधांचा धोका फक्त आधुनिक औषधांपुरताच मर्यादित राहिलेला नाहीं. वैद्य व हकीम जीं औषधें देतात त्यांतहि हा धोका मोठ्या प्रमाणावर पसरलेला आहे. ह्याचें एक कारण असें कीं, औषधांसाठी गोळा करण्यांत येणाऱ्या वनस्पतींची माहिती त्या गोळा करणाऱ्यांना असतेच असें नाहीं. शिवाय औषधांत भेसळ करण्याची प्रवृत्ति देशी औषधांच्या बाबतींतहि बरीच आढळून येते.

**टेलिफोन खात्याची मोठी थकबाकी**—टेलिफोन वापरणाऱ्या लोकांकडून अगर संस्थांकडून टेलिफोन खात्याची ३ कोटी रुपये बाकी येणें आहे. ह्या रकमेंत टेलिफोनचें भाडें आणि कॉल्सचा आकार ह्यांचा समावेश आहे. ह्या मोठ्या थकबाकीपैकी बरीच मोठी रक्कम सरकारी खात्यांकडूनच यावयाची आहे. ही रक्कम सुमारें २.२० कोटी रुपये भरेल. थकबाकी वसूल करण्यासाठीं कडक उपाय योजण्याच्या सूचना टेलिफोन खात्याला देण्यांत आल्या आहेत.

**हैदराबादमधील गलिच्छ वस्त्या**—हैदराबाद हें भारतामधील पांचव्या क्रमांकाचें मोठें शहर आहे. शहरांतील प्रत्येक १० नागरिकांमागें १ जण गलिच्छ वस्तींत राहात आहे, असें एका पाहणींत आढळून आलें. गेल्या कांहीं वर्षांत शहरांतील गलिच्छ वस्त्यांची संख्या २० वरून ८६ पर्यंत वाढली आहे. २१ वकील, ५ कलावंत आणि ३ जादूगार अशा वस्त्यांतून राहतांना आढळून आले.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.